महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण, मुंबई या कार्यालयातील १३ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्र.: मविन्या १०२२/प्र.क्र.०९/वि.प्र.४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०२ एप्रिल,२०२४.

वाचा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक मविन्या-१०१८/ प्र.क्र.१४८ /वि.प्र.४,
दि.१६.०३.२०१९, दि.१९.१०.२०१९, दि.२०.०३.२०२०, दि.१५.०९.२०२०,
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक मविन्या-१०२१/प्र.क्र.२२/वि.प्र.४,
दि.१२.०३.२०२१ व दि.२३.०८.२०२१,
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.११.०९.२०१९,
दि.१२.०२.२०२०, दि.३१.०८.२०२०, दि.१५.०२.२०२१, दि.१०.०८.२०२१,
दि.२२.०२.२०२२, दि.१८.०८.२०२२,
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.मविन्या १०२२/प्र.क्र.०९/वि.प्र.४, दि.१५.०९.२०२३
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०२४

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण, मुंबई या कार्यालयातील १३ अस्थायी पदांना, वित्त विभाग, शासन निर्णय मविन्या १०२२/प्र.क्र.०९/वि.प्र.४, दि.१५.०९.२०२३ अन्वये दि.२९.०२.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. न्यायाधिकरणाच्या कामाचे वेगळे स्वरुप (न्यायालयीन कार्यालयासारखे) लक्षात घेता, सदर १३ अस्थायी पदांची कार्यालयास नितांत आवश्यकता असल्याने, या पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण, मुंबई या कार्यालयातील, सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविलेल्या १३ अस्थायी पदांना, संदर्भाधीन क्रमांक ४ येथील दि.१५.०९.२०२३ च्या शासन निर्णयान्वये दि.२९.०२.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता सदर पदांना, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०२४ मधील अटींच्या अधीन दि.०१.०३.२०२४ ते दि.३१.०८.२०२४ पर्यंत किंवा पाचव्या खंडपीठाच्या व्यवस्थेबाबत पुढील निर्णय होईपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. या संदर्भात होणारा खर्च "मागणी क्र.जी-१, प्रधानशीर्ष २०४०, विक्री, व्यापार इत्यादींवरील कर, (०२) महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण, (०२) (०१) महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण (२०४० ००६२) ०१ वेतन" या लेखाशिर्षाखाली त्या-त्या वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/ १६/आ.पु.क., दि.२१.०२.२०२४ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०४०२१५०४१३९००५ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANJUSHA MANDAR SALVI

Digitally signed by MANJUSHA MANDAR SALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=5f3fd7897fea9717dd9115f782c19536afee03d1736a0283493a8863fadebb45, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2A02139FD3AC94FCBACD18386C5C6655556F2E876E9782822225D5F1AA558DEC, cn=MANJUSHA MANDAR SALVI
Date: 2024.04.02 15:13:55 +05'30'

(मंजुषा साळवी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई-१०,
१) महालेखापाल-१/२ (लेखा व परीक्षा), मुंबई/नागपूर,
२) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३) विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई-१०,
४) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
७) मा.मंत्री (वित्त), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
९) सचिव (वित्तीय सुधारणा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१०) अवर सचिव, प्रशासन-४ व वि.प्र.१,२, व ३,
११) निवडनस्ती- विक्रीकर प्रशासन ४.

<u>विवरणपत्र-अ</u>

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.मविन्या-१०२२/प्र.क्र.०९/वि.प्र.४, दि.०२ एप्रिल, २०२४ सोबतचे विवरणपत्र :-

अ.क्र.	संवर्गाचे नाव	दि.०१.०३.२०२४ ते दि.३१.०८.२०२४ पर्यंत मुदतवाढ दिलेली अस्थायी पदे	दि.०१.०३.२०२४ ते दि.३१.०८.२०२४ पर्यंत किंवा पाचव्या खंडपीठाच्या व्यवस्थेबाबत पुढील निर्णय होईपर्यंत मुदतवाढ दिलेली अस्थायी पदे
(अ) राजपत्रित			
१	सदस्य अ) न्यायिक ब) विभागीय	 १ १	 १ १
२	प्रबंधक	१	०
३	सहाय्यक प्रबंधक	०	१
	एकूण राजपत्रित	**३**	**३**
(ब) अराजपत्रित			
४	राज्यकर निरीक्षक	२	१
५	लिपिक-टंकलेखक	३	१
	एकूण अराजपत्रित	**५**	**२**
महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणातील एकूण राजपत्रित व अराजपत्रित अस्थायी पदे		**८**	**५**